# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आयुक्त यांचे कार्यालय

मुख्यालय, 2रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/आयुक्त/ 56 /2023-24 दि. 11 /10/2023.

वाचा :- 1) जा.क्र.मनपा./आयुक्त/726/2021-22 दि. 26/06/2021 रोजीचे कार्यालयीन आदेश.

2) जा.क्र.मनपा./आस्था/1104/2021-22 दि. 12/08/2021 रोजीचे कार्यालयीन आदेश.

3) जा.क्र.मनपा./आयुक्त/106/2021-22 दि. 30/09/2021 रोजीचे कार्यालयीन आदेश.

4) जा.क्र.मनपा./आयुक्त/52/2023-24 दि. 04/09/2021 रोजीचे कार्यालयीन आदेश.

## कार्यालयीन आदेश

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये प्रशासकीय सुसुत्रता येण्यासाठी उपरोक्त संदर्भिय आदेशानुसार देयकांना मान्यता देण्याबाबत अधिकार प्रदान करण्यात आलेले होते. त्यामध्ये काही विभागांना स्पष्टता येत नसल्याने वरील आदेश रद्द करून खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

या आदेशाद्वारे उपरोक्त संदर्भिय सर्व आदेश अधिक्रमित करण्यात येत आहेत व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४९,६८,६९,८४ (१) नुसार ठेकेदार/पुरवठादार यांच्या प्रदानासाठीची देयके मंजुरीचे अधिकार खालीलप्रमाणे राहतील.

| अ.क्र. | अधिका-याचे नाव | देयके मंजूर करण्याची रक्कम |
|---|---|---|
| १ | उपायुक्त (मुख्यालय) | १) रु.५० हजारापर्यंतच्या रक्कमेची सर्व देयके.<br>२) वीज, पाणी, दुरध्वनी, इंधन, वेतन व निवृत्तीवेतन, नगरसेवक भत्ता, वाहन भत्ता, शासकीय देणी व महापालिका निधीचे अंतर्गत हस्तांतरण (विशेष निधी वगळून) ची सर्व देयके. |
| २ | अतिरिक्त आयुक्त | १) रु.५० हजार ते रु.०३ लाखापर्यंतची अंतिम देयके (अधिनस्त विभागाची)<br>२) अतिरिक्त आयुक्तांच्या अधिनस्त विभागाची रु.०३ लाखावरील सर्व देयके त्यांच्यामार्फत मा.आयुक्त यांचेकडे मान्यतेसाठी पाठवावीत.<br>३) महिला व बालकल्याण विभाग, समाज कल्याण विभाग, अंध व दिव्यांग कल्याण व क्रिडा विभागाकडून देण्यात येणारे अनुदान, आर्थिक सहाय्य (शैक्षणिक) मदत/ मानधनाची रु.५० हजारावरील सर्व देयके (सक्षम प्राधिका-याने प्रस्तावास मंजुरी दिलेल्या दरानुसार) मंजुर करण्याचे अधिकार संबंधित विभागाच्या अतिरिक्त आयुक्त यांना राहतील. |
| ३ | आयुक्त | रु.५० हजारावरील सर्व चालू देयके (R.A.Bill) व रु.०३ लाखावरील सर्व अंतिम देयके (रु.५० हजारावरील सर्व चालू व रु.०३ लाखावरील सर्व अंतिम देयके संबंधित विभागाच्या अतिरिक्त आयुक्त यांच्यामार्फ़त) |

तसेच यापूर्वी काही विभागप्रमुखांना प्रशासकीय किंवा निविदा/दरपत्रके मागविण्याचे अधिकार काही आदेशाने दिलेले असतील ते सर्व आदेश या आदेशानुसार रद्द करण्यात येत असून सर्व प्रशासकीय, वित्तीय तसेच निविदा/दरपत्रके मान्यतेचे अधिकार आयुक्त यांचेकडे राहतील.

मंजुर देयकांच्या प्रदानार्थ सर्व धनादेश मुख्यलेखाधिकारी व उपायुक्त (मुख्यालय) यांच्या संयुक्त स्वाक्षरीने प्रदान करण्यात येतील.

या आदेशाचे सर्वांनी काटेकोरपणे पालन करावे.

**(संजय श्रीपतराव काटकर,** भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,

१. अतिरिक्त आयुक्त (सर्व)
२. उपायुक्त (सर्व)
३. मुख्यलेखापरिक्षक
४. मुख्यलेखाधिकारी
५. खाते प्रमुख / विभाग प्रमुख (सर्व)
६. आदेशनस्ती
७. संकेत स्थळावर प्रसिध्दीसाठी